**।। ॐ श्री साईराम ।।**

**'साई पर्ल्स ऑफ व्हिजडम'**

**साई ज्ञानमौक्तिके**

भगवान साईबाबांच्या चरणकमलांना वंदन

भाग १३-ड

## ह्या गोष्टी कोणाला हव्या असतात?

मग मी कृतज्ञतापूर्वक बाबांना विचारलं, ''भगवान, ह्या सगळ्या गोष्टी आम्हाला कोण सांगेल?''

तेव्हा बाबा म्हणाले, ''ह्या गोष्टी कोणाला हव्या आहेत? प्रत्येकाला, त्याला किंवा तिला स्वत:ची आवड असते, ऐहिक प्रगती, पैसा, दर्जा किंवा कुटुंब याच गोष्टी हव्या असतात. मी त्या गोष्टी सांगायला तयार आहे, पण या गोष्टी कुणाला हव्या आहेत? कोणालाही नकोत. कुणीही तयार नाही. म्हणून 'ह्या गोष्टी कोण सांगेल?' असं म्हणू नकोस. त्या सांगायला मी इथे आहे, पण त्या ऐकायला कोण तयार आहे? त्यांना त्यांच्या स्वत:च्या इच्छा आणि समस्या आहेत. या गोष्टी कोणालाही नको आहेत, आणि कोणालाही समजणार नाहीत, म्हणून मी त्याबद्दल बोलत नाही. खरं म्हणजे मला या विषयावर बोलायचं आहे.''

असं स्वामी म्हणाले.

'स्वामी या वेदना तुम्ही सोसू नका!!

त्या वर्षी शिवरात्रीचा उत्सव संपला होता. स्वामींनी काही विधानं केली. ते सर्व कुतुहलजनक होतं.

शिवरात्रीच्या कालावधीमध्ये त्यांनी त्यांच्या दैवी प्रवचनापूर्वी एका मुलाला बोलायला सांगितलं. तो मुलगा त्याच्या भाषणात म्हणाला, ''स्वामी, आज आम्हाला इथे शिवलिंग पाहायचे नाही, कारण लिंग बाहेर आणण्यासाठी तुम्हाला खूपच वेदना सोसाव्या लागतात. तुम्हाला इतक्या वेदना होताना पाहणं आम्हाला नको आहे. त्यासाठी स्वामी, तुम्ही दु:ख सोसू नका. आम्हाला ते नको आहे.''

पण तरीही स्वामींनी सर्वांसाठी लिंग साक्षात केलं. दुसऱ्या दिवशी स्वामींनी त्या मुलाला पुढे बोलावलं, ''अरे बाळ, इकडे ये. काल तू काय म्हणालास?''

''स्वामी, मी फक्त म्हणालो, ''तुम्ही एवढी खटपट करू नका आणि कुठलंही दु:ख सहन करू नका. आम्हाला ते नको आहे. आज शिवलिंग नको. तुम्हाला होणाऱ्या इतक्या यातना आम्हाला बघायच्या नसतात.''

बाबा म्हणाले, ''नाही, नाही, नाही. तुम्हाला आनंद देण्यासाठी मी यातना सहन करायला तयार आहे. तुमच्या समाधानासाठी फक्त. मला काय त्रास होतो हे बघण्याची जरुरी नाही.''

मग माझ्याकडे पाहून ते म्हणाले, ''काल हा मुलगा म्हणाला, ''लिंग साक्षात करू नका, स्वामी. हा त्रास सहन करताना आम्हाला बघवत नाही.'' आता मला सांग की तो जिंकला की हरला, यशस्वी झाला की अयशस्वी?'' स्वामींनी लिंग साक्षात करणं हे त्याला नको होतं, पण तरीही स्वामींनी ते साक्षात केलं, तर तो मुलगा विजयी झाला की पराभूत?''

मग मी म्हणालो, ''स्वामी, मला वाटतं शिवलिंग साक्षात होताना तुम्हाला होणाऱ्या त्रासाबद्दल त्याच्या भावना व्यक्त करण्यात तो यशस्वी झाला. तथापि, तुम्ही त्याचं न ऐकता लिंग साक्षात केलेत म्हणून तो अयशस्वी ठरला. म्हणजे तो जिंकला आणि हरलाही.'' (हशा)

म्हणजेच आम्हीही ही दैवी लीला बघून शिकलो असतो. (हशा) त्यांच्याबरोबर इतका वेळ घालवताना आम्हीही शिकत असतो, समजले ना?

मग बाबा म्हणाले, ''नाही, नाही. तो दोन्ही बाबतीत जिंकला आहे.''

शेवटी निर्णय हा त्यांचाच असल्यामुळे ते इतर कुणाचे उत्तर मान्य करणार नाहीत. त्यांचा निर्णय अखेरचा!

''स्वामी, ते कसं काय?''

बाबा म्हणाले, ''अंत:करणापासून प्रार्थना करण्यात तो यशस्वी झाला. फार छान. त्याची प्रार्थना ऐकून जर मी लिंग साक्षात केलं नसतं तर सर्व लोकांनी त्याला दोष दिला असता. त्या मुलाने सांगितलं की आम्हाला लिंग नको आहे आणि म्हणून मी ते साक्षात केलं नसतं तर लोकांनी त्याला दोष दिला असता. आता लोकांनी त्याला नावं ठेवली नाहीत म्हणून त्याही बाबतीत तो यशस्वी झाला आहे. तो लोकांच्या दोषातून मुक्त झाला आहे, म्हणजे दोन्ही बाबतीत यशस्वी झाला आहे.''

आणि आता ते म्हणाले, ''ना कु, नो पुलु लेवू''

'नोपी' म्हणजे दु:ख.

स्वामी म्हणाले, ''मला कसलेही दु:ख, वेदना होत नाहीत. अन्नी ओपुले''

ओप्पु म्हणजे 'बरोबर.'

''प्रत्येक गोष्ट बिनचूक असते. नो ओप्पु – दु:ख नाही. ऑल ओप्पुले – सगळं बरोबर आहे. मी जे करतो ते बरोबरच असते.''

अशा प्रकारे त्यांनी तेलगु शब्दावर कोटी केली.

## ''तुमच्या स्तुतीने मी भारावून जाणार नाही.''

मी म्हणालो, ''स्वामी, एका गोष्टीबद्दल मला तुमचे आभार मानायचे आहेत.''

ते म्हणाले, ''कोणती गोष्ट?''

जेव्हा तुम्ही बसून लिंग साक्षात करता, तेव्हा प्रत्येकाला ते पाहणं शक्य नसतं. मी मनात प्रार्थना करत होतो, की भगवान, तुम्ही सर्व बाजूंना टी.व्ही. सेट का नाही लावत, ज्यामुळे सर्व जण शिवलिंग उद्‌भव होत असताना पाहू शकतील. मी मनात प्रार्थना करत होतो, कसंही असलं तरी, तुम्ही इतके कनवाळू आहात की टी.व्ही सेट्स न ठेवता, तुमच्या मुखातून शिवलिंग बाहेर येत असताना तुम्ही उठून उभे राहता, त्यामुळे एवढी गर्दी असूनही ते पाहू शकतात, हाच तुमचा केवढा दयाळूपणा! स्वामी, शिवलिंग उद्‌भव होत असताना प्रचंड गर्दीमुळे ते सर्वांना पाहणं शक्य नसतं. प्रत्येकाला खूप खूप आनंद व्हावा, म्हणून तुम्ही सहानुभूतीनं उभे राहता.''

तेव्हा स्वामी म्हणाले, ''मी तुमच्या स्तुतीने भारावून जाणार नाही. (हशा) तुमच्या स्तुतीचा किंवा दोषारोपांचा माझ्यावर काही परिणाम होणार नाही. मी ते माझ्या आनंदासाठी करतो. माझ्या भक्तांच्या आनंदामुळे मी आनंदित होतो एवढंच! तुमच्या स्तुतीसाठी नाही.''

असं भगवान म्हणाले.

## ''मायामुक्त होण्यासाठी मी काय करायला हवे?''

नंतर मी म्हणालो, ''स्वामी. शिवरात्रीच्या या वर्षामध्ये तुमच्या प्रवचनांमध्ये तुम्ही मायेचा उल्लेख काल्पनिक असा केलात. मायेतून बाहेर पडण्यासाठी मी काय करायला हवं? मी काय करायला हवं?''

ते म्हणाले, ''तू काही करू नकोस. तुला काहीही करायची जरुरी नाही. माया म्हणजे काय हे जर तुला कळलं तरी ते पुरेसं आहे. ती काल्पनिक आहे ते कळलं तर ती जाईल.''

''जर मला कळलं तर जाईल?''

''हो.''

''मला काहीच करायला लागणार नाही?''

''बरोब्बर! आता तू काय म्हणतोस?''

''स्वामी, कृपा करा- मला समजले नाही.''

तेव्हा त्यांनी एक उदाहरण दिलं. हे एक सामान्य उदाहरण आहे आणि ते प्रत्येक वेळेस देतात.

''तू संध्याकाळच्या वेळी चालत आहेस. त्यावेळेस रस्त्यावर तुला एक नग दिसतो. एकदम तू त्याला बघून घाबरतोस. तू त्याच्यावर प्रकाशाचा झोत टाकतोस आणि तुला दिसतं की तो नाग नसून केवळ एक दोरी आहे; जिचा तुला नाग म्हणून आभास झाला होता. एकदा तुला कळतं की तो नाग नसून फक्त दोरी आहे, तेव्हा तू भयमुक्त होतोस, तू भीतीपासून मुक्त होतोस.''

जेव्हा तुम्हाला कळतं की ही माया आहे तेव्हा तुम्ही भीतीमुक्त होता, जसं सत्य कळल्यावर भीती दूर होते त्याप्रमाणे तुम्ही मायेपासून मुक्त होता. जेव्हा तुम्हाला कळतं की ती माया किंवा भास आहे, तेव्हा तिच्याविषयी पूर्ण सावध राहिलं की ती निघून जाईल.

## ''आवरण बाजूला करणे : स्वत:विषयीची जागृती''

आता स्वामींनी काही उदाहरणे दिली. काही वेळा वयाच्या ४० ते ५०व्या वर्षी आपल्या डोळ्यात मोतीबिंदू वाढू शकतो. डोळ्यावर एक पापुद्रा निर्माण झाल्याने दिसणं कमी होत जातं. आताच्या काळात मोतीबिंदू लहान वयातदेखील होऊ शकतो. हा जो पापुद्रा डोळ्यावर आवरण निर्माण करतो, तो डोळ्यातूनच निर्माण होतो, बाहेरून येत नाही. शेजाऱ्याच्या घरातून तो माझ्या डोळ्यात येत नाही, तो माझ्याच डोळ्यावर निर्माण झालेला पडदा असतो, जो माझ्या डोळ्यातील बुबुळाच्या बाहुलीला झाकून टाकतो.

अगदी तसेच एक पाण्याचे तळे असते, ते शेवाळ्याने झाकले जाते, पाण्यात शेवाळे तयार होते आणि तेच शेवाळे पाण्याला झाकून टाकते. त्याला काही जाणीव असते का? आणखी उदाहरण म्हणजे इथे अग्नी असतो आणि अग्नीतून राख निर्माण होते. आणि ही राख अग्नीला झाकून टाकते. तसेच ढग निर्माण होण्याचे कारण सूर्य असतो. आणि ढग सूर्याला झाकून टाकतात. तशीच 'माया' ही तुमच्यातच असते. मायेला कुणीही तुमच्यामध्ये ठेवत नाही. ती तुमच्या आतूनच निर्माण झालेली असते. बाहेरच्या कोणाकडून ती आलेली नसते म्हणून ती तुम्हालाच बाहेर घालवायला हवी. मायेतून बाहेर पडणं हे तुमचं काम आहे. कारण ती तुमच्या आतच असते. हे स्पष्ट झालं का?

ही सर्व भगवानांनी दिलेली उदाहरणं आहेत.

''मग मी काय करायला हवं स्वामी? जर ती माया माझ्या आतच आहे तर मी काय करावं? (हशा)

मग ते म्हणाले, ''अग्नि हा राखेने झाकलेला आहे. तुम्ही काय कराल? (अनीलकुमार फुंकर मारतात आणि राख उडवल्यासारखे दाखवतात.) राख उडवून लावाल. राख उडून जाईल आणि अग्नि दिसू लागेल. आता पाणी हे शेवाळ्याने झाकलेले आहे. तुम्ही काय कराल? शेवाळ काढून टाका म्हणजे तुम्हाला पाणी दिसेल. ढग सूर्याला झाकून टाकतात, तुम्ही काय कराल? थांबा, वारा ढगांना दूर नेईल आणि नंतर तुम्हाला सूर्यप्रकाश दिसेल.''

''म्हणजेच, राखेला उडवणे, शेवाळे दूर करणे, वाऱ्याने ढगांना पळवून लागणं या सगळ्यांची तुलना तुम्ही सावधानता किंवा आत्मज्ञान ह्याबरोबर करू शकाल. जर 'मी कोण आहे?' याचे वास्तव ज्ञान किंवा स्वत:विषयीचे ज्ञान जर तुम्हाला झालं तर माया किंवा भास आपणहून निघून जातील.''

किती सुंदर उत्तर आहे हे!

इथे जागृती, स्वत:चे किंवा आत्मज्ञान म्हणतात, ते केवळ भगवानच स्पष्ट करू शकतात. इतक्या साध्या पद्धतीने दुसरा कोणीही हे समजावून सांगू शकत नाही.

पण मी थोडासा अडाणी, अज्ञानी असल्याने अजून एक प्रश्न माझ्या डोक्याच्या कोपऱ्यात आहेच.

''माया किंवा भास परत येईल का?''

''स्वामी!''

''हो, बरं काय?''

''माया निघून गेली आहे. ती परत माझ्याकडे परत येण्याचा धोका आहे का? का ती कायमची सोडून गेली आहे? भासदेखील गेला आहे. तो परत होईल का? का तो कायमचा गेला आहे?''

बाबा हसले आणि म्हणाले, ''तीन गोष्टी लक्षात ठेव. एक म्हणजे ती एकदा आली तर परत कधीच जाणार नाही, दुसरे म्हणजे परत गेली तर परत कधीच येणार नाही, तिसरं असं की ती येतही नसते आणि जातही नसते.''

ओ हो! तीन गोष्टी - मी एक प्रश्न विचारला होता आणि स्वामींनी तीन उत्तरं दिली!

''त्या कोणत्या, स्वामी?''

''एक, जर ते आले तर कधीच जाणार नाही- ज्ञान आणि जागृती. दुसरं ते गेले की कधीही परत येत नाही- ते अज्ञान आणि तिसरं म्हणजे ते येतही नाही आणि जातही नाही- ते म्हणजे तुमच्यातलं स्वत्व, आत्मा, चैतन्य किंवा जाणीव.''

## ''राहू काल म्हणजे काय?''

हं! मला ही चर्चा थोडीशी हलकी फुलकी करायची होती.

''स्वामी, राहू काल म्हणजे काय?''

राहूकाल: भक्त मंडळी असं म्हणताना तुम्ही ऐकलंच असेल की सकाळी ३ ते ४.३० आणि ५ ते ६.३० हा राहूकाल असतो. अगदी आजपर्यंत मला त्याविषयी काहीही समजत नाही. आणि माझा त्यावर विश्वासही नाही. त्या विषयाबद्दल मला प्रामाणिक असायला हवं. म्हणून बाबा जेव्हा त्याविषयी बोलतात आणि भक्तही त्याविषयी सौजन्याने आणि सभ्यतेने बोलतात, तेव्हा मी माझे तोंड बंद ठेवतो. पण मला राहुकालाबद्दल काहीही माहिती नाही. संवाद थोडा हलका करण्यासाठी मी एक साधा, सोपा प्रश्न विचारला होता. (हशा)

म्हणून मी स्वामींना विचारलं, ''राहुकाल म्हणजे काय असते?''

(जरी वैयक्तिक माझा विश्वास नाही)

''राहू काल हा असा काळ आहे की जो अशुभ काळ मानला जातो. तो ग्रहांचा संबंध दाखवतो आणि विषुववृत्तापासून पृथ्वीची स्थिती दाखवतो कारण पृथ्वी सूर्याभोवती फिरत असते. त्यालाच 'राहूकाल' असे म्हणतात.''

''ओह, स्वामी. तो माझ्या बाबतीत काय करू शकतो? जेव्हा ग्रह अशा प्रकारे फिरत असतील, जेव्हा सूर्याची स्थिती तशी असेल, तर मला त्या वेळेस काय करायला हवं?''

मग ते म्हणाले, ''या कालावधीत सूर्यकिरणांमध्ये काही विषारी द्रव्यघटक असतात. प्रत्येकाने काळजी घ्यायला हवी. तुम्ही या कालावधीत ज्या ज्या गोष्टी करता, त्या फलदायक होत नाहीत. म्हणून राहूकाल हा खूप पाळला जातो.'' असं भगवान म्हणाले.

ठीक आहे. मला ह्या विषयात फार उत्सुकता नसल्यामुळे मी ही चर्चा पुढे चालू ठेवली नाही. दुसरं म्हणजे मला माझं ह्या विषयावरील अज्ञान प्रकट करण्याचा धोका पत्करायचा नव्हता म्हणून मी फक्त हात जोडून शांत राहिलो.

## ‘‘माझ्या आसपास कोठेही राजकारण नको आहे.’’

एक दिवस एक मोठा राजकारणी माणूस, जो मंत्रीही होता, स्वामींकडे आला आणि म्हणाला, ‘‘स्वामी, आपण एकमेव, अद्वितीय आहात. ह्या देशातली सर्व महाविद्यालये आणि विद्यापीठे तुमच्या व्यवस्थापनाखाली असावीत अशी आम्हा सर्व मंत्र्यांची प्रार्थना आहे. तशी प्रत्येकाचीच प्रार्थना आहे. तुम्ही हॉस्पिटल चालवता, तुम्ही विद्यालये चालवता. त्यामुळे ते अतिशय छान होईल.’’

बाबा हे बाबाच आहेत! ते म्हणाले, ‘‘माझ्या व्यवस्थापनेचा राजकारणाशी काहीही संबंध नाही. तुम्ही लोक येता आणि जाता. तुम्ही तुमचे पक्ष बदलत असता, पण मी येतही नाही आणि जातही नाही. मी बदलत नाही. मी फक्त माझा एकटाच आहे, दुसरा कोणीही नाही. दुसऱ्याशिवाय माझे काम चालू ठेवतो. मी माझ्यापासून राजकारणाला नेहमी दूर ठेवतो. माझ्या आसपास मला कोठेही राजकारण नको आहे.

तुम्ही राजकारणी तुमचे शब्द फिरवता. आज तुम्ही ‘हो’ म्हणाल, उद्या ‘नाही’ म्हणाल. मी त्या वृत्तीचा नाही. मी जे काही बोलतो ते एकच असते, मी तेच पाळतो. मी त्यालाच धरून राहतो आणि त्याप्रमाणेच कृती करतो.’’ असं भगवान म्हणाले.

## ‘‘सुवर्णलिंग’’

आणि मग, संध्याकाळच्या सभेची समाप्ती अशा कठोर, गंभीर टिप्पणीने करायची नव्हती, त्याकरता मला चांगल्या प्रकारे निरोप घ्यायचा होता. ‘‘स्वामी, तुम्ही साक्षात केलेलं लिंग हे सोन्याचं लिंग आहे. ते खरोखरीचे सोने आहे का? ते सुवर्णलिंग जे तुमच्या शरीरातून अवतीर्ण झाले ते सोनंच आहे का?’’

ते म्हणाले, ‘‘होय, नक्कीच!’’

‘‘आहे! असं का?’’

तेव्हा मग भगवान म्हणाले, ‘‘तुमच्या शरीरात सर्व धातू असतात. सर्वांच्या शरीरात सर्व प्रकारचे धातू असतात. सोनंसुद्धा. आणि शरीरातील हे सोनं तीव्र उष्णतेमुळे विशिष्ट आकार घेते. जेव्हा ते एक निश्चित रूप घेते तेव्हा हे लिंग अतिप्रचंड जोर लावल्याने प्रचंड धक्क्याने बाहेर येते. त्यामुळे– तुझ्या लक्षात आले असेलच – ते लिंग ‘टक’ असा आवाज होऊन बाहेर येते आणि प्रचंड धक्क्याने जमिनीवर पडते. हे तू पाहिलेच असशील. म्हणून, प्रचंड उष्णता निर्माण झाल्याने सोनं लिंगाचा आकार धारण करते आणि खूप जोराने बाहेर येते. हेच ते ‘हिरण्यगर्भ लिंग.’ असं भगवान म्हणाले.

‘‘ओह्, स्वामी!’’

‘‘तुमच्यामध्येसुद्धा हे असते, पण तुम्ही ते बाहेर काढू शकत नाही, मी काढू शकतो.’’

‘‘ते सर्वांची नावे सांगत होते.’’

दुसऱ्या दिवशी भगवानांनी त्यांच्या जुन्या दिवसांविषयी सांगावयास सुरूवात केली. त्यांनी त्यांच्या मद्रास आणि दिल्लीच्या भेटींविषयी बोलण्यास सुरूवात केली. ते मद्रासमधील सर्व रस्त्यांची आणि स्थळांची नावे सांगत होते.

तेव्हा मी म्हणालो,‘‘स्वामी, तुम्हाला मद्रासमधल्या सर्व रस्त्यांची नावं माहीत आहेत का?’’

‘‘हो! वयाच्या अकराव्या वर्षीपासूनच मी मद्रासला जाऊ लागलो. अगदी अकराव्या वर्षी मी प्रथम मद्रासला गेलो. मद्रासचा कोपरा अन् कोपरा मला माहीत आहे.’’ असं स्वामी म्हणाले.

आणि त्यानंतर त्यांनी बरेचसे मंत्री, मोठी माणसं, केंद्रातील मंत्री, राज्यमंत्री, कलाकार, महाराजे, जमीनदार आणि कोर्टातील न्यायाधीश यांनी स्वामी मद्रासला असताना ज्या मोठ्या व्यक्तींनी भेटी दिल्या, त्यांच्याबद्दल

स्वामी सांगत होते.

तेव्हा स्वामी म्हणाले, ‘‘हे बघ! मधमाशा जशा कमळातला मध शोषून घ्यायला येतात, तसे हे लोक या स्थळाला भेटी देतात.’’

## ‘‘झाड जिथे उगवतं तिथंच ते वाढतं.’’

जेव्हा मी संध्याकाळची सभा संपवली, तेव्हा स्वामींनी एक विधान केलं. कृपा करून या महत्त्वाच्या विधानाचे अनुकरण करा.

‘‘खूप लोकांनी ह्या स्थळाला भेट दिली आणि शहरात जाऊन राहण्याची विनंती केली. कारण पुट्टपर्ती हे त्या काळी एक लहानसे खेडेगाव होते. त्याकाळी पुट्टपर्तीला येण्यासाठी चांगले रस्ते नव्हते आणि बसेसही नव्हत्या. लोकांना बैलगाडीतून प्रवास करावा लागे. तुला हे माहीत आहे का? त्यांना इथे पोचताना खूप अडचणी येत असत.’’

म्हणून शहरातल्या लोकांनी स्वामींना विनंती केली, ‘‘स्वामी, कृपा करून बंगलोरमध्ये वस्ती करा. जिथे रेल्वे, बसेस, विमाने असून त्यामार्गे प्रवास करणे सोपे होईल. तुम्ही ही जागा का बदलत नाही?’’

पण बाबा म्हणाले, ‘‘नाही. जिथे बीज पेरलेले असते, जिथे ते रुजवले जाते, तिथेच त्याने वाढले पाहिजे. जिथे झाडाचा जन्म झालेला असतो, तिथेच त्याने वाढायला पाहिजे, दुसरीकडे कुठे नाही.’’

आणि आज आपल्याला या स्थळाचं महत्त्व समजत आहे. एका छोट्या खेड्याचं परिवर्तन जागतिक गावामध्ये झालं आहे. आणि सर्व देशातील लोक इथे आकर्षित होतात आणि त्यांना शांती, सांत्वना आणि आनंद मिळतो. हीच सत्यसाईबाबांची दैवी महान योजना आहे.

***